# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६२८ दिनांक ०५.०८.२०२०

## “पालघर पोलीसांनी पुरस्थितीत वाचवले जनसामान्यांचे प्राण”

पालघर जिल्हा हा अति पर्जन्यवृष्टीसाठी प्रसिद्ध आहे. पालघर जिल्हयात डोंगर/जंगलांचे प्रमाण जास्त असल्याने बरेचसे दळणवळणाचे रस्ते हे डोंगर द-यातुन जंगलातुन जात असल्याने दरडी कोसळून/झाडे पडून रस्ते बंद होणे, पुर आल्याने छोटेपुल/खोलगट व सखल भागातील वस्त्या पाण्याखाली जाणे असे प्रकार होत असतात. त्यामुळे श्री. दत्तात्रय शिंदे (भापोसे) पोलीस अधीक्षक पालघर यांनी पालघर जिल्हयातील सर्व पोलीस अधिका-यांची आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने व्हिडीओ कॉन्फरन्सद्धारे मान्सुनपुर्व बैठक आयोजीत करुन पावसाळयामध्ये वरीलप्रमाणे प्रकार झाल्यास त्यावर करावयाच्या उपाययोजनाबाबत मार्गदर्शन केले होते.

दि.०३/०८/२०२० रोजी हवामान खात्याने दि.०४/०८/२०२० व दि.०५/०८/२०२० रोजी कोकण किनारपट्टी परिसरात अतिपर्जन्यवृष्टी होऊन पुरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याचा इशारा दिला होता.

दि.०५/०८/२०२० रोजी पालघर जिल्हयात पहाटे पासुनच मुसळधार पावसाला सुरुवात झाली. हवामान खात्याच्या अंदाजानुसार अतिपर्जन्यवृष्टी होऊन पुरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने श्री. दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी अपर पोलीस अधीक्षक वसई आणि पालघर तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी आणि जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे अधिकारी यांना सतर्क राहुन कोणत्याही प्रकारची जिवित अथवा वित्तहानी होऊ नये यासाठी हद्दीतील लोकांना सुरक्षीत स्थळी हलविणे, धोकादायक रस्त्यावरुन कोणाला जाऊ न देणे व आपत्ती व्यवस्थापन साहीत्यासह पथके तयार करुन आवश्यक ती खबरदारी घेत लोकांच्या जिविताचे तसेच मालमत्तेचे रक्षण करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.

श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक पालघर व त्यांचे सहकारी श्री.विक्रांत देशमुख, अपर पोलीस अधीक्षक पालघर व श्री.विजयकांत सागर, अपर पोलीस अधीक्षक वसई हे वरिष्ठ पोलीस अधिकारी स्वत: पहाटे ०४.३० वाजल्यापासून या आपत्कालीन परिस्थितीमध्ये शोध व बचाव मोहीमेसाठी वेगवेगळया ठिकाणी व वेगवेगळया परिसरामध्ये भेटी देऊन अधिनस्थ अधिका-यांना मागदर्शन करीत होते व त्यांचे मनोबल वाढवित होते. पालघर जिल्हयामध्ये एकुण सहा पोलीस ठाण्यातंर्गत शोध व बचाव मोहीमेमध्ये पालघर जिल्हा पोलीस

दलाने एकुण २२ लोकांचे प्राण वाचविण्याची महत्वाची कामगिरी केलेली आहे. तसेच कित्येक ठिकाणचे रस्त्यावरील अडथळे दुर करुन वाहतुक व जनजिवन सुरळित करण्याचे काम केलेले आहे. खालील पोलीस ठाण्यातील अधिकारी/कर्मचारी यांनी पुरपरिस्थीतीत विशेष कामगीरी केलेली आहे.

## तलासरी

दि.०४.०८.२०२० व दि.०५.०८.२०२० रोजी पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे तलासरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दारोटा कळू नदीला मोठया प्रमाणावर पुर आलेला होता. सदर नदीच्या पाण्याने धोक्याची पातळी ओलांडलेली होती. सदर पुराच्या पाण्यामुळे आजुबाजुच्या वाडयामधील घरामध्ये पाणी शिरले होते.

दि.०५.०८.२०२० रोजी तलासरी पोलीस ठाण्यास वाडीपाडा या गावी राहणारे श्री महेश देवजी यांच्या घरात नदीच्या पुराचे पाणी जाऊन त्या घरातील ७ जणांचा जीव धोक्यात असल्याने गावातील इतर दोन लोक त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करत असतांना ते दोघेही पुराच्या पाण्यात अडकलेले असल्याची माहीती मिळाल्याने पोनि/अजय वसावे व त्यांच्या पथकाने मुसळधार पावसात घटनास्थळी जाऊन पुराच्या पाण्याची पर्वा न करता पुराच्या पाण्यातुन स्थानीकांच्या मदतीने श्री.महेश देवजी यांच्या घरापर्यंत पोहोचुन तेथे अडकलेल्या ९ इसमांना बाहेर काढून त्यांचे जीव वाचविले आहेत. सदर ९ इसमांना सुरक्षित स्थळी नेऊन त्यांच्यावर प्रथमोपचार करुन त्यांची राहण्याची व जेवण्याची सोय करण्यात आलेली आहे.

## कासा

कासा पोलीस ठाण्याच्या हद्दीत लिलकापाडा येथे राहणारा इसम नामे विजय लिलका त्याच्या कूटूंबीयासह त्यांच्या शेतातील घरात असतांना सासुसुन नदीला पुर आलेला होता. दि.०५.०८.२०२० पहाटे ०२.०० वाजता डोंगरावरुन आलेला पाण्याचा लोंढा व पुराच्या पाण्यामुळे श्री विजय लिलका यांची पाच वर्षाची मुलगी कु. ममता ही त्या पाण्यातुन वाहून गेली. सदर बाबत पहाटे ०३.०० वा च्या सुमारास कासा पोलीस ठाण्यास माहीती मिळाल्यानंतर मसपोनि सिद्धवा जायभाये हया त्यांचे सहकारी सपोउनि/राजू चौधरी, पोहवा/ नवले, पोना/सहारे आणि पोशि/सोनवणे यांच्यासह आपत्कालीन रेस्क्यू ऑपरेशनसाठी लागणाऱ्या साधनसामग्रीसह रेस्क्यु ऑपरेशनसाठी सायवन नाका मार्गे बापुगाव येथे जात असतांना वाघाडी येथे झाड पडल्याने रस्ता बंद झाला परंतू मसपोनि जायभाये यांनी प्रसंगावधान दाखवून त्या पथकांसह उधवा मार्गे बापुगाव येथे गेल्या.

त्यांनी काही स्थानिकांना बरोबर घेऊन शोध मोहीम चालू केली. परंतू सदरचा संपुर्ण परीसर हा मुसळधार पावसामुळे गुढघ्या एवढया चिखलाने भरलेला असल्याने मसपोनि जायभाये व त्यांच्या पथकाने सुमारे दिड ते दोन किलोमिटरचा परीसर अनवाणी पिंजून काढला. सदर मुलगी जेथून वाहून गेली होती त्या जागेपासून ४००/५०० मिटर अंतरावर

शोधमोहीमेतील एका इसमाला मुलीच्या मुसमसण्याचा आवाज आल्याने सर्वांनी आपले लक्ष त्या बाजुकडे केंद्रीत करुन पहाटे ०६.३० वाजताच्या सुमारास सदर मुलगी पाण्याने वेढलेल्या एका झाडाला अडकलेली दिसून आल्याने मुलीची तात्काळ सुटका करण्यात येऊन प्रथम तिला प्रथमोपचार देण्यात आले. त्यानंतर तिचेवर प्राथमिक आरोग्य केंद्र सायवन येथे उपचार करुन तिला तिच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे.

अशा प्रकारे मसपोनि जायभाये व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुसळधार पाऊस व चिखलाची पर्वा न करता वाहून गेलेल्या मुलीस शोधण्यासाठी पहाटे ०३.०० वा ते सकाळी ०६.३० वाजेपर्यंत प्रयत्नांची पराकाष्ठा करुन मुलीस जिवंत शोधण्याची उत्तम कामगिरी केलेली आहे.

## केळवा

केळवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि.०४.०८.२०२० रोजी सायंकाळ पासून मुसळधार पाऊस चालू होता. दि.०५.०८.२०२० रोजी पावसाचा जोर वाढून पावसाच्या पाण्यामुळे सर्व रस्ते पाण्याखाली जाऊन वाहतुक ठप्प झालेली होती. पो.स्टे. हद्दीतील माकुणसार या गावाच्या पुढे असलेल्या ब्रम्हदेव मंदीराच्या आसापास असलेल्या खारटनामध्ये पाण्याची पातळी खुपच वाढलेली होती. त्यातच भरती असल्याने पाण्याची पातळी वाढत होती. सदर खारटनाच्या पुर्वेस एका घरामध्ये श्री सागर व सारीका चौधरी हे दाम्पत्य त्यांच्या शेतावरील घरात अडकले होते तसेच पश्चिमेस साधारण १० ते १२ स्त्री/पुरुष पाण्यात चोहोबाजुने वेढले गेले होते. या बाबत माहीती प्राप्त झाल्यानंतर सपोनि मानसिंग पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपत्कालीन परिस्थितीत वापरावयाची साधनसामग्री उदा. फायबर बोट, रस्सी, लाईफ जॅकेट यासह स्थानीक लोकांच्या मदतीने पाण्यात उतरुन सर्व लोकांची पाण्यातुन सुटका केलेली आहे. मुसळधार पाऊस, खारटनात साचलेले पाणी यामुळे त्यांच्या स्वतःच्या जिवितास धोका असतांनाही त्यांनी नमूद इसमांना सुखरुप व सुरक्षितरित्या बाहेर काढून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवलेले आहे.

## घोलवड

दि.०५.०८.२०२० रोजी पहाटे ०५.०० वाजण्याच्या सुमारास घोलवड पोलीस ठाण्यास झाई ते वेवजी रस्त्यावर दरड कोसळलेली असून वाहतुक ठप्प झालेली आहे अशी माहीती मिळाली.

घोलवड पोलीस ठाण्याचे सपोनि प्रकाश सोनवणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी जे.सी.बी. व इतर साधनांची जुळवाजुळव करुन तात्काळ घटनास्थळावर पोहोचून मुसळधार पावसात सलग दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर रस्त्यावरील दगडगोटे व माती बाजुला करुन रस्ता खुला करुन वाहतुक सुरळित केलेली आहे.

## सातपाटी

सातपाटी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पानेरी गावाजवळ दि.०५.०८.२०२० रोजी ०५.०० वाजण्याच्या सुमारास मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरामुळे इसम हरीओम मिश्रा वय ५८ वर्षे, रा. साईमंदीर, वडराई हा जवळ असलेल्या वडाच्या झाडावर चढला होता. परंतू सदर झाडाच्या आसपास पुर्ण पाण्याने वेढा घातलेला असल्याने व त्याच्याकडे संपर्काचे साधनही नसल्याने त्याने आरडाओरडा केल्यानंतर पोलीस ठाण्यास माहीती मिळाली. सपोनि जितेंद्र ठाकुर व त्यांच्या सहका-यांनी तात्काळ तेथे पोहोचून सदर इसमाची वडाच्या झाडावरून सुटका केली. जर त्याची आणखी काही वेळ सुटका केली नसती तर त्याच्या जिवीताचे बरेवाईट होण्याची दाट शक्यता होती. तसेच त्याचेवर प्रथमोपचार करून त्यास सुरक्षितस्थळी हलविण्यात आलेले आहे.

## सफाळा

दि.०५.०८.२०२० रोजी लालठाणे गावचे हद्दीत दरडसदृश मातीदगडाचा ढिगारा रस्त्यावर कोसळून वाहतुक पुर्णपणे बंद झालेली होती. सदर बाबतची माहीती सफाळा पोलीस ठाण्यास मिळाल्यानंतर सपोनि सुनिल जाधव त्यांच्या सहका-यांनी तात्काळ घटनास्थळावर पोहोचून स्थानीक नागरीकांना मदतीस घडुन फावडे/टिकाव व इतर साहीत्याच्या मदतीने रस्त्यच्या मधोमध पडलेला मोठा दगड बाजुस केला. तसेच स्वत: रस्त्यावर पडेलेले लहानमोठे दगडगोटे व माती फावडयाच्या सहाय्याने बाजुला करून वाहतुक एका तासाच्या आत सुरळित केलेली आहे.